महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४.

क्र.कोविमं/खा.वि.१२ वी परीक्षा/2962
कोल्हापूर-
दिनांक- २४ /१० /२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/ कोल्हापूर

विषय- फेब्रुवारी/मार्च- २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी ) परीक्षेसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी (Enrolment Certificate) प्रमाणपत्राबाबत व सदर विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याच्या तारखाबाबत ..

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की , फेब्रुवारी - मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नाव नोंदणी प्रमाणपत्रासाठी (Enrolment Certificate) नियमित शुल्कासह ऑनलाईन अर्ज दिनांक ३०/०९/२०१९ पर्यंत सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. **त्याअनुषंगाने जे विद्यार्थी नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या नाव नोंदणी प्रमाणपत्राबाबत (Enrolment Certificate) दिनांक ३०/१०/२०१९ पासून त्यांच्या भ्रमणध्वनीवर व ईमेलवर संदेश (SMS) उपलब्ध होतील. अशा विद्यार्थ्यांनी आपले स्वत:चे नावनोंदणी प्रमाणपत्र http://form17.mh-hsc.ac.in या संकेत स्थळावरून दिनांक ३०/१०/२०१९ पासून उपलब्ध करून घ्यावीत.**

तसेच सदर नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या खाजगी विद्यार्थ्यांची फेब्रु/मार्च-२०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahahsscboard.in** या संकेत स्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | खाजगी विद्यार्थ्यांची ऑनलाईन पध्दतीने परीक्षेची आवेदनपत्रे उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावयाच्या तारखा | खाजगी विद्यार्थी परीक्षा आवेदनपत्रांचे शुल्क उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| नियमित शुल्कासह | **शुक्रवार दि. ०१/११/२०१९ ते शुक्रवार दि. १५/११/२०१९** | **शुक्रवार दि. ०१/११/२०१९ ते मंगळवार दि. २६/११/२०१९** |
| विलंब शुल्कासह | **शनिवार दि. १६/११/२०१९ ते सोमवार दि. २५/११/२०१९** | |

अ. उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या वितरण केंद्रावर शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख = गुरूवार दिनांक २८/११/२०१९ .

ब. आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी Pri-list Print करून विद्यार्थ्यामार्फत आवेदनपत्रातील सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्याची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

इ.१२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने खाजगी विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कोल्हापूर विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क **बँक ऑफ इंडियाच्या Virtual Account** द्वारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करून चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

२. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

३. आवेदनपत्रांसोबत नियमित / विलंब शुल्क भरल्याशिवाय त्यावरील पुढील प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची नोंद घ्यावी.

४. आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Letter /pawar